| **Headline:** SEBI Chairman reviews progress of GIFT IFSC | |
|---|---|
| **Source:** Loksatta | **Date:** 30 September 2017 |

# 'गिफ्ट सिटी'मधील रोखे बाजारांच्या परिचालनाची सेबीप्रमुखांकडून पाहणी




**अहमदाबाद :** अहमदाबादमध्ये नव्याने विकसित गुजरात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) अर्थात गिफ्ट सिटीमध्ये रोखे बाजारांच्या कार्यान्वयनाला सुरुवात झाली असून, त्यांच्या परिचालनाची पाहणी शुक्रवारी भांडवली बाजाराची नियंत्रक 'सेबी'चे अध्यक्ष अजय त्यागी यांनी पाहणी केली. राष्ट्रीय शेअर बाजार अर्थात एनएसईच्या तेथील इमारतीला त्यांनी भेट दिली. गेल्या सहा महिन्यांत भांडवली बाजार तसेच क्लिअरिंग कंपन्यांनी तेथे केलेल्या कामकाजाची त्यागी यांना माहिती दिली तसेच कार्यपद्धतीला आणखी प्रभावी करण्यासाठी कोणते उपाय योजले जात आहेत हेही सांगितले, असे आयएफएससी केंद्राचे अध्यक्ष सुधीर मंकड यांनी स्पष्ट केले. एनएसईच्या बाजार सहभागींना आकर्षित करून घ्यावयाच्या योजना आणि भविष्याविषयी वृद्धी योजनांचीही सेबीप्रमुखांकडून आढावा घेण्यात आला, असे एनएसईने प्रसिद्धीपत्रकान्वये स्पष्ट केले आहे.